# Operation Muskan

Operation Muskan-

**13 (11 boys and 2 girls) Missing Children found during Muskan Operation. 4 children returned to parents and other sent to children remand Home.**

## 'मुस्कान'मध्ये आढळली १३ मुले-मुली!

### चार जण पालकांच्या ताब्यात; उर्वरित तूर्त बालगृहात दाखल

सकाळ वृत्तसेवा

धुळे, ता. २८ : हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' मोहिमेत शहरात आतापर्यंत १३ बालके आढळली. त्यात ११ मुले व दोन मुलींचा समावेश आहे. यातील चार मुलांना त्यांच्या आई-वडिलांकडे सोपविण्यात आले, तर अन्य मुलांना तूर्त निरीक्षणगृहात ठेवण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केंद्रीय गृह मंत्रालयाने हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी १ ते ३१ जुलैपर्यंत 'ऑपरेशन मुस्कान' ही विशेष मोहीम राबविण्याची सूचना दिली. जिल्हा पोलिस अधीक्षक पाटील यांनी नियोजन करीत जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना ही मोहीम राबविण्याची सूचना दिली. बालकल्याण समिती, जिल्हा बालसंरक्षण कक्ष, सर्व बालगृहे, संबंधित जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाअंतर्गत बालगृहांच्या संस्थाचालकांना सहभागी करून घेण्यात आले.

**शहरात शोधमोहीम**

धुळे शहर व परिसरात हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यात आला. रस्त्यांवर विविध वस्तू विकणारे, हॉटेलमध्ये काम करणारे, कचरा वेचणारे, बसस्थानक, रेल्वेस्टेशन, धार्मिक स्थळे आदी ठिकाणी शोध घेतला असता अवधान शिवारातील 'एमआयडीसी' भागात काम करणारी चार मुले, साक्री रोडवरील हॉटेलवर काम करणारी सहा मुले, रेल्वे स्टेशनवर भीक मागणाऱ्या दोन मुली व एक मुलगा, असे एकूण १३ मुले-मुली आढळले.

**मुले पालकांच्या ताब्यात**

अवधान 'एमआयडीसी' भागात सापडलेल्या चार मुलांना त्यांच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले. या मुलांना शाळेत पाठवू, मोलमजुरी करू देणार नाही, असे जबाब नोंदवून ही मुले त्यांच्या ताब्यात देण्यात आली. बालकल्याण समिती, जिल्हा बालसंरक्षण कक्षाच्या अध्यक्षा रत्नमाला पाटील यांनी ही कार्यवाही केली.

**अन्य मुले निरीक्षणगृहात**

तसेच १३ पैकी नऊ मुला-मुलींचे कायदेशीर पालक समक्ष हजर झाले नाहीत. त्यामुळे मुलांना तूर्त साक्री रोडवरील निरीक्षणगृहात, तर मुलींना देवपूर भागातील कमलाबाई अजमेरा मुलींच्या बालगृहात ठेवण्यात आले आहे. या मुलांच्या पालकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. हॉटेलवर काम करणारी मुले राज्याबाहेरील आहेत.

**पोलिसांचे आवाहन**

जिल्हा पोलिस अधीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बालकल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष समितीच्या अध्यक्षा रत्नमाला पाटील, सदस्या डॉ. उषा साळुंखे, स्वाती काळे, संगीता राणे, चंद्रकांत मोरे, संजय जोशी, संदीप पाटील, श्री. गिरासे, मयूर वाघ, श्री. चव्हाण, सावित्री पाटील, दामिनी पथकातील पोलिस उपनिरीक्षक घुगे, पोलिस उपनिरीक्षक वर्षा पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे हवालदार एम. एम. काझी, प्रवीण पाटील आदींनी या बालकांचा शोध घेऊन पुढील कार्यवाही केली. यापुढेही ही मोहीम सुरू राहणार आहे. मोहिमेस जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.




**धुळे : जिल्हा पोलिस प्रशासन कार्यालयात 'ऑपरेशन मुस्कान'अंतर्गत झालेल्या बैठकीनंतर शोधवाहनासह उपस्थित पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील, देविदास शेळके, रत्ना पाटील, डॉ. उषा साळुंखे, स्वाती काळे, संगीता राणे यांच्यासह बालगृहांचे प्रतिनिधी.**